# वाणिज्य मंडळ

# २०१६-१७



## वार्षिककार्यक्रम

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम | व्याख्याते |
|---|---|---|---|
| १ | २८/०६/२०१६ | बँकींग क्षेत्रातील सर्वसमावेषकता | श्री. अभिषेकपवार |
| २ | १४/१२/२०१६ | वाणिज्य शाखा आणिस्पर्धापरिक्षा | श्री. जीवन देसाई |
| ३ | २३/१२/२०१६ | खाद्य महोत्सव | |
| ४ | ०२/०२/२०१७ | माजी यशस्वी विद्यार्थ्यांचेकरिअरवरमार्गदर्शन | स्नेहल पाटील, रोहितजाधव, प्रितेशराहाटे |

# शिक्षणकर्जाचा सदुपयोग विद्यार्थ्यांनी करावा……

श्री. अभिषेकपवार, सिंडीकेटबँक, शाखा - शृंगारतळी

विद्यार्थ्यांनी नवीनबँकींगतंत्रज्ञानाचावापरजागरूकपणेकरावाकीजेणेकरून आपलीफसवणूकहोणारनाहीअसेआवाहनसिंडीकेटबँक, शृंगारतळीचेअधिकारीश्री. अभिषेकपवार यांनी केले. पाटपन्हाळेमहाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळामार्फतमंगळवारदि. २८ जुन २०१६ रोजी आयोजित “वित्तीय सर्वसमावेशकता व बदलतेबँकींग” या विषयावर श्री. पवार यांनी मार्गदर्शनकेले. आपल्या मार्गदर्शनामध्ये त्यांनी वित्तीय सर्वसमावेशकता या विषयी सविस्तरविवेचनकरून आजच्या काळामध्ये त्याची नेमकीगरज काय आहे तसेच त्याचे स्वरूपकसे आहे हेस्पष्ट करूनसागिंतले. केंद्र सरकारच्या धोरणांनुसारग्रामीणभागातील लोकांना त्यामध्ये कसेसमाविष्ट करूनघेतले जाणार आहे हेही त्यांनी स्पष्ट केले. सद्याच्या बँकींग व्यवस्थेमध्ये कसेबदल होतआहेतहे त्यांनी विविध दाखले देऊनस्पष्ट केले. यामध्ये प्रामुख्याने मोबाईल बँकींग, ऑन लाईन बँकींग, एटीएम इ. साधनांचावापरकरतांनाकाहीधोकेअसतात व त्यापासून जेविविधधोकेअसतात त्यापासून सावधानताकशीबाळगावीहे त्यांनी स्पष्ट केले. वरील संदर्भातकाहीतक्रारी असल्यास त्या कोणाकडे कराव्यात, विद्यार्थ्यांनी पदवीपर्यंत नथांबता पदव्यूत्तर शिक्षणतसेच उच्च शिक्षणाच्या प्रवाहातराहून ज्या करिअरच्या विविधवाटाआहेत त्यासाठी राष्ट्रीयकृतबँकाकडून मिळणाऱ्या शिक्षणकर्जाचा विचारकरूनस्वावलंबी व्हावे असेआवाहन त्यांनी केले. बँकांमध्ये विविध प्रकारच्या स्पर्धापरिक्षाअसतात त्यांची महाविद्यालय जीवनापासूनचकशी तयारी करावीकीजेणेकरूनकरिअर लवकरहोऊ शकेल यासंबधी सखोल माहितीश्री. पवार यांनी दिली.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविककु. वृंदालीजाधव व आभारप्रदर्शनप्रसादभेकरे यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य मंडळाचेसर्वविद्यार्थी सदस्य, प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. क्रिष्णाजीशिंधे यांनी परिश्रमघेतले.


पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे
अभिषेक पवार
वाणिज्य मंडळ.



# महाविद्यालयीन जिवनापासूनस्पर्धापरिक्षांची तयारी आवश्यक

## मा.जीवन देसाई

पाटपन्हाळेकला वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फेस्पर्धापरिक्षांची तयारी या विषयावर चिपळूणचेतहसिलदारमा. जीवन देसाई यांच्या व्याख्यानाचे बुधवारदि. १४ डिसेबंर २०१६ रोजी आयोजन करण्यात आलेहोते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये संसदीय प्रणाली, नोकरशाही व त्यामध्ये असणा-या शासकीय अधिका-यांचे स्थान यावर माहितीदेऊनस्पर्धापरिक्षांची तयारी कशापध्दतीनेकरता येईल याची माहितीदिली. केंद्र शासनाच्या विविधपदांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणा-या विविधपरिक्षांची तयारी याची तसेचमहाराष्ट्र शासनामार्फतमहाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणा-या विविधपदांची थोडक्यात माहितीदिली. या सर्वपदांची तयारी हीमहाविद्यालयीन जिवनापासूनच विद्यार्थ्यांनी केल्यास त्यांना पदवीनंतर चांगल्या शासकीय नोकरीचीहमीमिळू शकतेहेविविध उदाहरणांच्या आधारेस्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गटविकासअधिकारी, विक्रीकरअधिकारी, विक्रीकरनिरिक्षक, पोलिसउपनिरिक्षक इ. पदांसाठी असणा-या पुर्वपरिक्षा, मुख्य परिक्षा व मुलाखत या तिन्ही टप्प्यांचे सविस्तरविवेचनकेले. पुर्व व मुख्य परिक्षेच्या संदर्भातमाहितीदेतांनामहाविद्यालयीन जिवनामध्ये त्याची तयारी नेमकीकशीहोऊ शकते याची माहितीदिली. याची तयारी करतांना लागणारेसंदर्भग्रंथ, द्यावा लागणारावेळ, इच्छाशक्ती यांचा कसामेळ घालावा याची माहितीदिली. तसेचमहाविद्यालयीन जिवनामध्ये विविधसांस्कृतिक, क्रिडास्पर्धा व इतर कार्यांमध्ये भाग घेतल्यास व्यक्तिमत्व विकासकसाहोतो व त्याचा मुलाखतीसाठीकशारितीने फायदा होतोहेसांगितले. महाविद्यालयाच्या सुरूवातीपासूनच याची तयारी केलीतरचपदवीनंतर या परिक्षेला सहजरित्या सामोरेजाता येते.ग्रामीणभागातील विद्यार्थीगुणवत्ताअसूनदेखील या क्षेत्रातमागेराहतात. यामुळे या परिक्षांसदर्भातग्रामीणभागातील विद्यार्थ्यांनी दुर्लक्ष करू नये व योग्य असेमार्गदर्शनघेऊनआत्मविश्वासानेस्पर्धापरिक्षा क्षेत्रात उतरल्यास त्यांच्या अंगी असणा-या गुणवत्तेला निश्चितच वाव मिळेल हे त्यांनी नमूदकेले. या कार्यक्रमाला पाटपन्हाळे एज्यूकेशन सोसायटीचे सहसचिवश्री. मंगेशजोशी, वाणिज्य विभागप्रमूख प्रा. एस.एस. खोत, प्रा. एल.एम. गजभिये, प्रा. के.आरशिंधे, वाणिज्य मंडळविद्यार्थी अध्यक्षा कुमारीभक्तीमहाडीकतसेचसर्वसभासद व महाविद्यालयाचे ३०० विद्यार्थीउपस्थितहोते.





# खाद्य महोत्सव

## खाद्यमहोत्सव (वर्ष चौथे)

दि. २३ डिसेंबर २०१६ रोजीमहाविद्यालयातील वाणिज्य मंडळाचासर्वातमोठाउपक्रमम्हणजेखाद्यमहोत्सव आयोजित करण्यात आला व तो यशस्वीरित्या संपन्न झाला. गेल्या चार वर्षांपासुन हा उपक्रममहाविद्यालयात वाणिज्य मंडळातर्फे राबविण्यात येत आहे. विविध पदार्थांचीरेलचेल या खाद्यमहोत्सवातहोती. विशेष म्हणजेसर्व पदार्थ विद्यार्थ्यांनी तयार केलेहोते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीनविकासासाठीविविधउपक्रमराबविलेजातात. विद्यार्थ्यांचे पर्यटन कौशल्य, घटना व्यवस्थापन, जाहिरात कौशल्य, व्यावसायिक कौशल्य, पाककृती, विपणन कौशल्य इ. कौशल्य वृध्दिंगत व्हावे म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या प्रकारच्या महोत्सवामधून विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख बनविण्याचे प्रयत्न केले जातात. ग्रामीणकोंकण दर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी गवताचीझोपडी, शेती, बैलगाडी, वाडीवस्तीवरील मंदिर, गुरांचा वाडा, शेती, शेततळे, मत्स्य पालन, मळा इ. दाखविण्यात आले. या महोत्सवाला भेट देणा-यांनी हेकोंकणीदर्शनपाहुन विद्यार्थ्यांच्या कौशल्याची स्तुतीकेली. या दर्शनाने प्रत्येक जनहे दृष्य पाहूनभारावूनगेले. या खाद्यमहोत्सवातविविध भारतीय व विदेशी पदार्थ उपलब्धहोते. पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री. सुधाकरजी चव्हाण यांच्या हस्ते या महोत्सवाचेउद्घाटन झाले. यावेळीगुहागरनगरपालिकेचे नगराध्यक्षा सौ. स्नेहावरंडे, संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. सुजाता चव्हाण, मुख्याध्यापक श्री. हिरवे, अनेकपत्रकार, वार्ताहर, ग्रामस्थ, प्रसिध्द व्यापारी श्री. मालाणी, श्री. खातू, श्री. दळी, श्री. गौरववेल्हाळ, या खाद्यमहोत्सवामध्ये एकूण ४० प्रकारचे खाद्यपदार्थ विद्यार्थ्यांनी तयार केले. सकाळी ०९.०० तेदुपारी ०३.०० या वेळेतसुमारे रू. १,५०,००० चीविक्री करण्यात आली.









# वाणिज्य शाखेमध्ये करिअरला मोठ्या प्रमाणातसंधी

## स्नेहल पाटील, रोहितजाधव, प्रितेशराहाटे

पाटपन्हाळेकला वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फेवाणिज्य शाखेमध्ये करिअरची तयारी या विषयावर वाणिज्य शाखेतून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचेमार्गदर्शनदि. २ फेब्रूवारी२०१७रोजी आयोजन करण्यात आले होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये वाणिज्य शाखेमध्ये करिअरच्या कोणकोणत्या संधी उपलब्धआहेत व महाविद्यालयीन जिवनामध्ये त्याची तयारी कशीकरावी या संदर्भातमोलाचे मार्गदर्शनकरून आपले अनुभवकथनकेले. या कार्यक्रमाला वाणिज्य विभागप्रमूख प्रा. एस.एस. खोत, प्रा. एल.एम. गजभिये, प्रा. के.आरशिंधे, वाणिज्य मंडळविद्यार्थी अध्यक्षा कुमारीभक्तीमहाडीकतसेचसर्वसभासद व महाविद्यालयातील तृतीय वर्षाचेविद्यार्थीउपस्थितहोते.





